आर.सी.सी.नं.१०५१/२०२२
निशाणी क्र.– ५६

**साक्षीदार क्र. ०६ सरकारपक्षातर्फे –**

मी शपथेवर सांगतो की,
नांव – तुकाराम मधुकर पाटील,
वय – ४४ वर्षे
व्यवसाय – आर.ओ. वॉटर सप्लाय,
राहणार – गुलाब भाऊ नगर, मोहाडी, धुळे, ता. जि. धुळे.

**सरतपास सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी अधिवक्ता श्री. ए.ए. लाली यांच्या वतीने –**

फिर्यादी मिना संजय पाटील यांना मी ओळखतो. ते आमच्या शेजारी राहतात. त्यांचे लग्न सन २००६ साली झाले होते. मिना लग्नानंतर भुसावळ येथे नांदायला गेली. मला मिना हिच्याकडून कळले की, तिला सासरचे लोक नांदवत नाही. तसेच तिला त्रास देत होते. मला ऐवढेच माहिती आहे. मिना हिने सदरच्या लोकांविरुध्द मोहाडी पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली होती. पोलिसांनी घटने संदर्भात माझा जबाब नोंदविला होता.

**उलटतपास आरोपीतर्फे अधिवक्ता श्री. पी.बी. कचवे यांच्यामार्फत सुरु –**

मी फिर्यादीच्या मामाच्या शेजारी १५ वर्षापासुन राहत आहे. माझा फिर्यादीच्या मामाच्या घराजवळ आर.ओ. प्लॉट आहे मी राहायला तेथे नाही. माझा आर.ओ. प्लाँट सकाळी ०६.०० ते रात्री ०९.०० वाजेपर्यंत चालतो. मला केवळ दहा विस मिनिटे संध्याकाळी फुरसत मिळते. मला त्यांच्याशी बोलणे कधी झाले होते हे सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मिनाचे माहेर हे जुवार्डी येथील आहे. मी मिनाच्या लग्नाला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, मिनाचे पती हे सरकारी नोकरीत होते. हे म्हणणे खरे आहे की, मिना हिला तिच्या पतीने सुरुवातीला नोकरीच्या ठिकाणी नांदायला नेले होते. हे म्हणणे खरे आहे की, मिनाच्या पतीला चांगला पगार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मिनाला आरोपी लोक त्रास देत होते असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मिना सुरुवातीला आरोपीसोबत चांगली नांदत होती. हे म्हणणे खरे आहे की, मी साक्ष देण्याकरीता फिर्यादीच्या मामासोबत आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, माइया सरतपासातील संपूर्ण मजकूर मी खोटा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण...

फेरतपास नाही...

श्रवणोत्तर स्विकृत,

CHAITANYA HARISHCHANDRA KULKARNI

Digitally signed by CHAITANYA HARISHCHANDRA KULKARNI
Date: 2024.07.30 17:51:14 +0530

( चैतन्य ह. कुलकर्णी )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे
(कोर्ट नं.२)

दिनांकः– ३०.०७.२०२४